**विभागीय आयुक्त कोकण विभाग कोकण भवन नवी मुंबई येथील निवाडा शाखेतील कार्य व कर्तव्ये यांचा तपशिल.**

कार्यालयाचे नाव- विभागीय आयुक्त कोकण विभाग यांचे कार्यालय

कार्यालयाचा पत्ता- निवाडा शाखा रुम नं. २२६, दूसरा मजला कोकण भवन नवी मुंबई ४००६१४.

कार्यालय प्रमुख-सहायक संचालक नगररचना, कोकण विभाग

शासकीय विभागाचे नाव-महसूल व वन विभाग

कोणत्या मंत्रालयातील खात्याच्या-महसूल व वन विभाग


आधिनस्त कार्यक्षेत्र-कोकण विभागातील सात जिल्हे-१) मुंबई शहर २) मुंबई उपनगर ३) ठाणे ४) रायगड ५) रत्नागिरी ६) सिंधुदूर्ग ७) पालघर

कार्यालयीन दुरध्वनी क्रमांक-०२२-२७५७२३२२

ईमेल-tpkdnaward@gmail.com

विशिष्ठ कार्ये- निवाडा शाखेमार्फत कोकण विभागातील अधिनस्त असलेल्या जिल्हाधिकारी कार्यालयाने प्रस्तावित केलेले प्रारुप निवाडे भूमि संपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापना करताना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क (महाराष्ट्र) नियम, २०१४ मधील नियम १८ (३) नुसार दयावयाची भरपाईची रक्कम ही, १० कोटी रुपयांपेक्षा अधिक असेल व १०० कोटी रुपयांपेक्षा कमी असेल, तर या वित्तीयस्तरावरील प्रारुप निवाडयाची पूर्व मान्यता विभागीय आयुक्त कार्यालय, निवाडा शाखेमार्फत दिली जाते.

निवाडा शाखेचा रचनात्मक तक्ता-



## विभागीय आयुक्त कोकण विभाग (निवाडा शाखा) यांचे कार्यालय

अ) निवाडा शाखेकडील कार्याचा तपशिल

| अ.क्र | कार्यासन | अधिकारी /कर्मचारी यांचेकडे असलेल्या कामाचा तपशील |
|---|---|---|
| १ | निवाडा शाखा | १) नविन भूसंपादन अधिनियम, २०१३ अंतर्गत निवाड्याची नुकसान भरपाई रक्कम १० कोटीपेक्षा जास्त व १०० कोटीपेक्षा कमी या वित्तीय मर्यादेंतर्गत प्राप्त प्रारुप निवाडयाची तांत्रिक छाननी करुन मा.विभागीय आयुक्त यांचेकडे मान्यतेसाठी सादर करणे.<br>२) नविन भूसंपादन अधिनियम, २०१३ अंतर्गत निवाड्याची नुकसान भरपाई रक्कम १०० कोटी पेक्षा जास्त रकमेच्या प्रारुप निवाडयाची तांत्रिक छाननी करुन शासन मान्यतेसाठी सादर करणे.<br>३) भूमिसंपादन अधिनियम, १८९४ अंतर्गत जाहिर केलेल्या निवाडयात राहून गेलेल्या बाबींसाठी प्राप्त सानुग्रह अनुदान प्रस्तावांची छाननी करणे व अभिप्राय /टिप्पणी मान्यतेसाठी सादर करणे.<br>४) शासन उद्योग विभाग निर्णय क्रमांक-आयडीसी/१८९३(२६२)/उद्योग-१४ दि.१४/०५/१९९३ नुसार महाराष्ट्र औद्योगीक विकास अधिनियम १९६१ चे कलम ३२, ३३(२),३६ व ३८ अन्वये जमिनीचे वाटाघाटीने भूसंपादन करताना प्रति हेक्टर रू.५०,००१/-ते १,००,०००/- पर्यंत नुकसान भरपाई देण्यासंबधी मुल्यांकन टिप्पणी व प्रारूप निवाडयास मंजुरी देण्याचे अधिकार विभागीय आयुक्त यांना प्रदान केलेले आहेत विभागीय आयुक्त यांचे वित्तीय मर्यादेंतर्गत प्राप्त प्रकरणात तांत्रिक छाननी करुन मा.विभागीय आयुक्त यांचेकडे मान्यतेसाठी सादर करणे.<br>५) नवी मुंबई प्रकल्प, नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ, रत्नागिरी विमानतळ, मुंबई मेट्रो प्रकल्प, विशेष रेल्वे प्रकल्प, मुंबई अहमदाबाद हायस्पीड रेल्वे प्रकल्प, MTHL (न्हावा सि लिंक रस्ता) द्रुतगती मार्ग, औद्योगिक प्रकल्प, लघुपाटबंधारे / मध्यम पाटबंधारे प्रकल्प, जलविद्युत प्रकल्प या व्यतिरिक्त बृहन्मुंबई, भिवंडी, ठाणे, कल्याण-डोंबिवली, उल्हासनगर, वसई-विरार, मिरा-भाईंदर, नवी मुंबई, पनवेल महानगरपालिका व कोकण विभागातील नगरपरिषदा यांचे विकास आराखडयातील सार्वजनिक वापरासाठी राखीव जागांचे महाराष्ट्र प्रादेशीक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम १२६ सह भूसंपादन पुनर्वसन व पुनर्स्थापना करतांना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम-२०१३ चे कलम १९ खालील/भूसंपादन अधिनियम, १८९४ चे कलम ६ खालील अधिसूचित जमिनीबाबत निवाडयाचे प्रस्ताव तसेच वित्तीय मर्यादेनुसार विभागीय आयुक्त स्तरावर मुल्यांकन टिप्पणी मंजूरी प्रदान करण्याकरीता त्यांची तांत्रिक छाननी करणे. तसेच सानुग्रह अनुदान प्रस्तावाची छाननी करुन शासनाचे मंजूरीसाठी सादर करणे<br>६) शासनाने वेळोवेळी भूसंपादन चौकशी प्रकरणात अपेक्षिलेले अभिप्राय सादर करण्याचे काम करण्यात येते. |